राज्य राखीव पोलिस बल, गट क्र.१, पुणे अंतर्गत एसआरपीएफ पोलिस पब्लिक स्कूल, वानवडी, जि.पुणे ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: एसएफएस-१०२५/प्र.क्र.५००/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २० ऑगस्ट, २०२६.

वाचा -

१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२, दि.१९/०१/२०१३.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/०९)/माशि-१, दि.११/०६/२००९.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: पीआरई २००७/(२५७/०९)/प्राशि-३, दि.०६/०८/२००९.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र.शिउसं/माध्य ३०४/ अवाभो/ स्व.अर्थ/न.शा./२०२५/७४२३, दि.०७/११/२०२४.

प्रस्तावना :-

राज्य राखीव पोलिस बल, गट क्र.१, पुणे अंतर्गत एसआरपीएफ पोलिस पब्लिक स्कूल, वानवडी, जि.पुणे ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देणेबाबत, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भ क्र.(४) येथे नमूद पत्रान्वये प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने, राज्य राखीव पोलिस बल, गट क्र.१, पुणे द्वारा संचलित एसआरपीएफ पोलिस पब्लिक स्कूल, वानवडी, जि.पुणे ही नवीन शाळा स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल, गट क्र.१, पुणे द्वारा संचलित एसआरपीएफ पोलिस पब्लिक स्कूल, वानवडी, जि.पुणे ही नवीन शाळा सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव व पत्ता	माध्यम	मंडळ	शाळेचा प्रकार
१	एसआरपीएफ पोलिस पब्लिक स्कूल, वानवडी, जि.पुणे	इंग्रजी	सी.बी.एस.ई.	प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)

<u>अटी व शर्ती</u> :-

I. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदी, प्राथमिक व माध्यमिक शाळांबाबतचे शासनाचे प्रचलित धोरण व निकष यांचे पालन करणे तसेच शाळेमध्ये आवश्यक वर्गखोल्या, सर्व भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील.

II. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमांन्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटीं व शर्तींचे पालन करणे अनिवार्य राहील.

III. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि १३.मे२०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

IV. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि.१७ एप्रिल, २०२६ अन्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८२०११४८२७५८४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=School Education Dept, 2.5.4.20=F82B9E0B005ED06987E1AE26683203C8F241022E0AAD6B1C827AF561B72F83BB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4901BED6A4BEE0ED963C63F1B0172A4718894A400C0988FBB3381DB913696F, cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2026.08.20 15:48:00 +05'30'

(प्रमोद कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, जि.पुणे.
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
८. निवडनस्ती (प्र.क्र.५००/२०२५/एसएम-२) (ई-१५१६०७८).